मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका 'कोंडवाडा' कधी उभारणार

## कोंडवाडा (गोठा) उभारण्यास दिरंगाई का : कुणाल साठे

**मनीषा थोरात-पिसाळ**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

तीन वर्षांपूर्वी शहरातील भटक्या व मोठ्या जनावरांसाठी टाळगाव चिखली येथे कोंडवाडा (गोठा) प्रकल्प उभारण्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजुरी दिली होती. यासाठी शहरातील विविध संघटनांनी अनेक वेळा आंदोलने करून प्रशासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. २०२२ मध्ये विश्व हिंदू परिषद आणि इतर संघटनांच्या वतीने महानगरपालिका भवन परिसरामध्ये भटकी जनावरे सोडून आंदोलन केले होते. यावेळी अनेक कार्यकर्त्यांवर गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत. परंतु अद्यापही हा प्रश्न प्रलंबित आहे. पिंपळे सौंदागर येथे श्वान फिरवण्यास आणण्यासाठी




उद्यान विकसित करण्यात आले आहे. याचा आनंदच आहे. यासाठी तत्परता दाखवणारे प्रशासन अनेक वर्षापासून रस्त्यावर फिरत असलेल्या गोवंश साठी कोंडवाडा (गोठा) उभारण्यास का दिरंगाई करीत आहे ? असा प्रश्न विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे सह संयोजक कुणाल साठे यांनी उपस्थित केला आहे.सकल हिंदू समाज पुणे जिल्हा, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल या संस्थेच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात साठे यांनी पुढे म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहरात भटक्या जनावरांचा गंभीर प्रश्न आहे. गोवंशाची तस्करी, चोरी असे अनेक प्रकार यापूर्वी घडले आहेत. मागील दोन वर्षांपूर्वी भोसरी, मोशी परिसरात गोवंशला भूलीचे इंजेक्शन देऊन तस्करी, चोरी करण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. अशा भटक्या जनावरांमुळे अनेक ठिकाणी अपघात घडले आहेत. याबाबत वेळोवेळी हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलने करून प्रशासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. या आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांवर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महानगरपालिकेत प्रशासकिय राजवट सुरू होण्याअगोदर २०२२ मध्ये कार्यकर्त्यांनी मनपा भवन परिसरामध्ये भटकी जनावरे आणून सोडून आंदोलन केले होते. त्यावेळी देखील हा प्रकल्प लवकर मार्गी लावू असे आश्वासन प्रशासनाने शिष्टमंडळास दिले होते. २०१२ पासून भटक्या गोवंशासाठी आणि मोठ्या जनावरांसाठी असा प्रकल्प उभारला जावा ही मागणी होती. तीन वर्षांपूर्वी चिखली येथे प्रकल्प उभारण्यास मंजुरी देखील मिळाली. श्वानांसाठी स्मशानभूमी व पार्क विकसित करणारे प्रशासन, दोन दिवसांपूर्वी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत ३५० कोटी पेक्षा जास्त रुपयांच्या कामांना मंजुरी देणारे प्रशासक तथा मनपा आयुक्त शेखर सिंह हे गोवंश व मोठी भटकी, जखमी जनावरे यांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी कोंडवाडा (गोठा) उभारण्यासाठी २०२३ मध्ये मंजुरी देण्यात आलेल्या प्रकल्पास का चालना देत नाहीत? असा उद्विग्न सवाल सकल हिंदू समाज पुणे जिल्हा, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल या संस्थांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विचारला आहे. याचे उत्तर प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह देतील काय ?पिंपरी चिंचवड हे वेगाने विकसित होणारे शहर आहे. स्मार्ट सिटी, स्वच्छ सिटी, मेट्रोसिटी म्हणून शहराचा नावलौकिक वाढत आहे. नागरिकांची मागणी नसताना अनेक मोठ्या प्रकल्पांना मंजुरी देऊन पत्रकार परिषद घेऊन प्रसिद्धी मिळविण्याचा हव्यास असणारे प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह या प्रश्नावर ठोस भूमिका घेऊन ती पत्रकार परिषदेत जाहीर करावी अशी मागणी हिंदुत्ववादी संघटना, बजरंग दलाच्या वतीने करण्यात आली आहे.

# कॅन्सर पीडित महिला आणि अंध मुलींनी केला रॅम्पवॉक

## एक हात मदतीचा आगळावेगळा फॅशन शो

**। पिंपरी-चिंचवड।** सौंदर्य स्पर्धा आणि फॅशन शो सारखे उपक्रम महिलांच्या आत्मविश्वास वाढीस मदत करतात. फॅशनच्या झगमगत्या दुनियेत केलेले रॅम्पवॉक हे आत्मविश्वास वाढविणारे असते. अशा स्पर्धेतील सहभागी महिलांबरोबरच कॅन्सर पीडित महिला आणि अंध मुलींना रॅम्पवॉक करण्याची संधी विष्णुप्रिया सेव्हेन आर्टस्



प्रस्तुत महाराष्ट्र आयकॉन २०२४ एक हात मदतीचा या फॅशनशो मध्ये देण्यात आली.अभिनेते देव झुंबरे व छायाचित्रकार गणेश गुरव यांनी चिंचवड येथे महाराष्ट्र आयकॉन २०२४ एक हात मदतीचा या संकल्पनेंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत किड्स कॅटेगरीत अध्या गाडे, मिस कॅटेगरीत तनिष्का वाडकर, मिसेस कॅटेगरीत पायल भाकरे, मिस्टर कॅटेगरीत वरुण नेहुल यांनी विजेते पदाचा मुकुट पटकावला. नारीशक्ती सरिता साने, उद्योजक अशोक धुरी, उत्कृष्ट अभिनेता सचिन दानाई, उत्कृष्ट पत्रकार अनिल वडघुले यांना 'महाराष्ट्र आयकॉन २०२४' हे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, चित्रपट निर्माते बाळासाहेब बांगर, पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले, सुनील हिरूरकर, अपंग केंद्र प्रमुख सुनील चोरडिया यांच्या उपस्थितीत बक्षीस व पुरस्कार वितरण करण्यात आले. स्पर्धेत परीक्षक म्हणून सोनाली कनखरे व मोनिका बांगाळ यांनी काम पाहिले.

विस्तृत विजेता निकाल – किड्स कॅटेगरीत फर्स्ट रनर अप पुर्वी आहिरे व सेकंड रनर अप तनुश्री कडु, मिस कॅटेगरीत फर्स्ट रनर अप ऐश्वर्या नारवणकर व सेकंड रनरअप श्रेया शिंदे, मिसेस कॅटेगरीत फर्स्ट रनरअप श्वेता रायकर व सेकंड रनर अप लक्ष्मी डावखरे आणि मिस्टर कॅटेगरीत फर्स्ट रनरअप आर्यन बजाज व सेकंड रनरअप निखिल फड यांनी बक्षीस पटकावले.

# महिला दिनानिमित्त महिलांचा ‘कीर्तन जागार’

## महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, शिवांजली सखी मंचचा पुढाकार

**| पिंपरी-चिंचवड |**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी|**

पिंपरी-चिंचवडमध्ये पहिल्यांदाच जागतिक महिला दिन आणि महाशिवरात्रीच्या निमित्ताने भोसरीत महिलांकडून महिलांसाठी महिला दिनानिमित्त महिला कीर्तनकारांकडून ‘शिव-शक्ती’चा जागर होणार आहे. हा अध्यात्मिक सोहळ्याच्या आयोजनासाठी पूर्णतः महिला स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला आहे.महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि शिवांजली सखी मंच्या पुढाकाराने प्रतिर्षी जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेतले जातात. यावर्षी महाशिवरात्री आणि




महिला दिन एकाच दिवशी आल्याचा दुग्धशर्करा योग आहे. या निमित्ताने आयोजकांनी भव्य कीर्तन महोत्सव- २०२४ आयोजित केला आहे. भोसरीतील महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनच्या मैदानावर शनिवार, दि. २ मार्च ते दि. ९ मार्च असे आठ दिवस हा भक्तीमय सोहळा रंगणार आहे. रोज सायंकाळी ५ ते ६ या वेळेत हरिपाठ आणि ७ ते ९ यावेळेत कीर्तन होणार आहे. बार्शी येथील ह.भ.प. शिवलीलाताई पाटील, बीड येथील ह.भ.प. परमेश्वरीताई परभणे, नाशिक येथील ह.भ.प. ज्ञानेश्वरीताई बागुल, भिवंडी येथील ह.भ.प. वनिताताई पाटील, ह.भ.प. शालिनीताई देशमुख-इंदोरीकर, खेड येथील ह.भ.प. सुप्रियाताई साठे-ठाकूर, सासवड येथील ह.भ.प. गीतांजलीताई झेंडे आणि बीड येथील ह.भ.प. सोनालीताई करपे कीर्तनसेवा करणार आहेत. बीड येथील अन्नपूर्णा माता मुलींची वारकरी शिक्षण संस्था कीर्तन साथ देणार आहे. तसेच, मृदुंगाचार्या ह.भ.प. यशोदाताई सोळुंके याही योगदान देणार आहेत. माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, महाराष्ट्र कुस्ती परिषदेचे सरचिटणीस बाळासाहेब लांडगे, भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे, तसेच, पठारे-लांडगे तालीम मंडळ, श्रीराम मित्र मंडळ, वैष्णव विचार कीर्तन महोत्सव संस्था, भोजेश्वर मित्र मंडळ, माळी-आळी मित्र मंडळ, संतश्रेष्ठ ज्ञानोबाराय-तुकोबाराय प्रतिष्ठान, नामस्मरण भजनी मंडळ, जय हनुमान मित्र मंडळ, आझाद मित्र मंडळ, श्री संत सावता माळी महाराज प्रतिष्ठान यांच्यासह समस्थ भोसरी आणि पंचक्रोशीतील भाविक-भक्त या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

# पाच वर्षांनी पोलीस आयुक्तालयाला मिळाली जागा

## सध्या पोलीस आयुक्त कार्यालयभाडेतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात

**| पिंपरी-चिंचवड |**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी|**

पाच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी हक्काची जागा मिळाली आहे. पुणे महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या मालकीची वाकड पेठ क्रमांक ३९ येथील डिस्ट्रीक सेंटरमधील १५ एकर जागा वाणिज्य चालू दरपत्रकानुसार पोलीस आयुक्तालयाला देण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या ठिकाणी सुसज्ज कार्यालय उभारण्यात येणार आहे.पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती १५ ऑगस्ट २०१८ मध्ये करण्यात आली. आयुक्तालयाचे कामकाज २०१८ मध्ये सुरू झाले. मात्र, गेल्या पाच वर्षांपासून अद्याप आयुक्तालयासाठी




हक्काची जागा मिळलेली नाही. देहूगाव गायरान येथील ५० एकर जागा पिंपरी-चिंचवड आयुक्तालयासाठी देण्याबाबत राज्य शासनाने मंजुरी दिली होती. मात्र, या जागेला देहू देवस्थान, स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला. त्यासाठी ग्रामस्थांनी आंदोलनात्मक भूमिका घेतली होती. ही जागा उपलब्ध होण्यास विलंब आणि अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे मोशी येथील गायरान जागेचीही पोलीस आयुक्तालयासाठी पाहणी केली होती. परंतु, त्या जागेचाही पर्याय मागे पडला.पाच वर्षांपासून पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयास स्वतंत्र जागा तसेच शासकीय इमारत उपलब्ध नाही. सध्याचे पोलीस आयुक्त कार्यालयसुद्धा पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेच्या इमारतीमध्ये भाडेतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात सुरु आहे. कामकाजाच्या दृष्टीने ही जागा अत्यंत अपुरी आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस आयुक्त कार्यालय तसेच इतर कार्यालये, कवायत मैदान, क्रीडांगण व निवासस्थाने यासाठी जागा मिळण्याकरीता शासनाला प्रस्ताव पाठविला. त्याचा पाठपुरावा केला. त्यानुसार राज्य शासनाने शुक्रवारी पुणे महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या मालकीची वाकड पेठ क्रमांक ३९ येथील डिस्ट्रीक सेंटरमधील १५ एकर जागा वाणिज्य चालब दरपत्रकानुसार पोलीस आयुक्तालयाला देण्यास मान्यता दिली आहे. हे ठिकाण हे मध्यवर्ती असून प्रशासकीय व नागरिकांच्या दृष्टीने सोयीचे होणार आहे.

# नोकरभरतीचा लाभ मराठा समाजालाही

## बारामतीत नमो महारोजगार मेळाव्याचे उद्घाटन

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** लोकाभिमुख असलेल्या महायुती सरकारने आतापर्यंत ७५ हजार युवकांना नोकरी दिली आहे. भविष्यात एक लाख ६० हजार युवकांना नोकरी दिली जाणार असून, नोकरभरतीचा लाभ आता मराठा समाजालाही होणार आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी बारामतीमध्ये दिली. तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले.बारामती येथील विद्या प्रतिष्ठानाच्या कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या नमो महारोजगार मेळावाच्या उद्घाटन कार्यक्रमात एकनाथ शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, विधान परिषदेच्या



उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार सुप्रिया सुळे, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, सुनेत्रा पवार आणि आमदार दत्तात्रय भरणे या वेळी उपस्थित होते. बारामती पोलीस उपमुख्यालय आणि पोलिसांचे निवासस्थान या इमारतींचे व बारामती एसटी बसस्थानकाचे उद्घाटनही शिंदे यांच्या हस्ते झाले.शिंदे म्हणाले, की नमो महारोजगार मेळावा ही नोकरीसाठी सुवर्णसंधी आहे. राज्यामध्ये यापूर्वी नागपूर, लातूर, नगर या ठिकाणी रोजगार मेळावा घेण्यात आला. या महारोजगार मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतरबारामती येथे रोजगार महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. फडणवीस म्हणाले, की पश्चिम महाराष्ट्रामध्ये नमो महारोजगार मेळावा घेण्यात आला. त्यामध्ये ५५ हजार पदे अधिसूचित करण्यात आली आहेत. यातून अनेक तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. अजित पवार म्हणाले, की उद्योजकांनी आपले उद्योग वाढवून नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. भारताबाहेर अनेक देशांमध्ये नोकऱ्या उपलब्ध आहेत.जर्मनीमध्ये अनेक नोकऱ्या उपलब्ध असून, त्या संधीचे सोने करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा. राज्यातील विकास कार्यामध्ये आता बारामतीचा पहिला क्रमांक लागेल, असा मला विश्वास वाटतो.रोजगारनिर्मितीकडे सरकारने लक्ष दिल्याने त्यांचे आभार मानतो. राजकारण बाजूला राहिले, पण मुख्यमंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांना या मुद्द्यावर आमची साथ राहील, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली. पवार म्हणाले, रोजगाराशी संबंधित हा कार्यक्रम आहे. राज्य सरकारला मी धन्यवाद देऊ इच्छितो, की आज रोजगार निर्माण करण्याची गरज आहे आणि राज्य सरकार ते काम करत आहे. राजकारण बाजूला राहिले. तरुणांना आधार देत आहेत, अशी भूमिका असेल, तर सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. तीच भूमिका घेऊन मुख्यमंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांना खात्री देतो, की तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी तुम्ही जे कराल त्यासाठी तुम्हाला साथ असेल. दरम्यान, शरद पवार व्यासपीठावर येताच मेळाव्याला उपस्थित तरुणांनी जल्लोष केला.नमो रोजगार मेळाव्यातून सुरुवातीला ४३ हजार नोकऱ्या मिळणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यांपैकी अनेक पदे ही प्रशिक्षणार्थींची आहेत. त्यामुळे हा महारोजगार मेळावा नसून, महास्किल कार्यक्रम असल्याची टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना केली. तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले.बारामती येथील विद्या प्रतिष्ठानाच्या कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या नमो महारोजगार मेळावाच्या उद्घाटन कार्यक्रमात एकनाथ शिंदे बोलत होते. देवेंद्र फडणवीस, अजित पवार,शरद पवार, डॉ. नीलम गोऱ्हे, सुप्रिया सुळे, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, सुनेत्रा पवार आणि आमदार दत्तात्रय भरणे या वेळी उपस्थित होते.

# अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न जाहीर झालाच पाहिजे

## मुख्यमंत्री शिंदे यांच भाषण सुरू होताच नागरिकांच्या घोषणा

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यातील संगमवाडी पुलाजवळील जागेत आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.

या कार्यक्रमाला भाजपचे नेते मंत्री चंद्रकांत पाटील,आमदार माधुरी मिसाळ, सुनील कांबळे, भीमराव तापकिर, सिद्धार्थ शिरोळे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, विभागीय आयुक्त



डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, क्रीडा आयुक्त डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, मनपा अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, तसेच आजी माजी पदाधिकारी देखील उपस्थित होते.या कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे भाषण करण्यास उभे राहताच, सभा मंडपातील काही नागरिकांनी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर झालाच पाहिजे,अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. त्यावेळी पोलिस आणि उपस्थित नेतेमंडळींची चांगलीच तारांबळ उडाल्याचे पाहण्यास मिळाले.नपोलिसांनी शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र तरी देखील घोषणा सुरूच होत्या, घोषणा देणार्या नागरिकांचा पवित्रा लक्षात घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अण्णाभाऊ साठे यांचा विजय असो, असे म्हणताच घोषणा देणारे नागरिक शांत झाले. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच भाषण सुरू झाले आणि लहुजी वस्ताद साळवे यांचे स्मारक कसे असणार, याबाबत त्यांनी माहीती देखील दिली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, क्रांतीगुरू लहुजी वस्ताद यांच्या आदर्शानुसार चालणारे सरकार असल्याने सर्वसामान्यांसाठी अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आज करण्यात आले आहे. मातंग समाज प्रामाणिक आणि कष्टाळू आहे, दिलेला शब्द पाळणारा आहे. बार्टीच्या धर्तीवर अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (आर्टी) स्थापना करून सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे मातंग समाजातील मुलांना आता उच्च शिक्षण घेता येईल. स्पर्धेच्या युगात या समाजाला इतर समाजाच्या बरोबर विकासात सहभागी करून घेण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

# मेफेड्रोन विक्रीतील पैसे हवालामार्गे दिल्लीत

## पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद यांनी न्यायालयात माहिती दिली

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

मेफेड्रोन तस्करी प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी हैदर शेखने पुणे, राज्यातील विविध शहरात, तसेच दिल्लीत मेफेड्रोन विक्रीस पाठविल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. मेफेड्रोन विक्रीतून आलेले पैसे हैदरने हवालामार्फत दिल्लीत पाठविल्याची माहिती पुणे पोलिसांनी शनिवारी न्यायालायत दिली.या प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी वैभव उर्फ पिंट्या भारत माने (वय ४०, रा. खडीचे मैदान, सोमवार पेठ), अजय अमरनाथ करोसिया (वय ३५, रा. हरकानगर, भवानी पेठ), हैदर नूर शेख (वय ४०, रा. भैरवननगर, विशांतवाडी), आयुब अकबर मकानदार (रा. सांगली), संदीप राजपाल कुमार (वय ३९), दिवेश चरणजीत भूतानी (वय ३८), संदीप हनुमानसिंग यादव (वय-३२), देवेंद्र रामफूल यादव (वय ३२, रा. दिल्ली) या आरोपींची पोलीस कोठडीची मुदत शनिवारी संपली. त्यांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमृत बिराजदार यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. गुन्हे शाखेच्या युनिट एकचे पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद यांनी तपासाबाबत न्यायालयात माहिती दिली. पुणे पोलिसांनी आंतराष्ट्रीय पातळीवरील अमली पदार्थ तस्करी प्रकरण उघडकीस आणले. आतापर्यंत पोलीसांनी एकूण तीन हजार ६७५ कोटी १३ लाख ६० हजार रुपयांचे एक हजार ८३७ किलो ५६८ ग्रॅम मेफेड्रोन जप्त केले आहे. आरोपींनी मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन उत्पादन, साठा, वितरण केले आहे. पुण्यातील प्रमुख अमली पदार्थ तस्कर हैदर शेखने मेफेड्रोन विक्रीतून मिळालेले पैसे दिल्लीतील वीरेन सिंग, संदिप धुनिया यांना पाठविल्याचा संशय असून त्याबाबत तपास करण्यात येत असल्याचे पोलीस निरीक्षक सय्यद यांनी न्यायालयात सांगितले.आरोपींनी अमली पदार्थ विक्रीतून मिळालेल्या पैशांमधून मालमत्ता खरेदी केली का?, मेफेड्रोन तयार करण्यासाठी त्यांना कोणी मदत केली, तसेच त्यांनी रासायनिक पदार्थ कोठून आणले, यादृष्टीने तपास करायचा आहे. त्यासाठी पोलीस कोठडी देण्याची विनंती सहायक सरकारी वकील अॅड. नीलीमा यादव-इथापे यांनी युक्तीवादात केली. बचाव पक्षाचे वकील अॅड. मते, अॅड. एम. बी. जगताप, अॅड. एस. डी. गदादे यांनी पोलीस कोठडीस विरोध केला. न्यायालयाने आरोपी वैभव माने, अजय करोसिया, हैदर शेख यांना चार मार्चपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. आरोपी मकानदार, संदीप कुमार, संदीप यादव, दिवेश भूतानी, देवेंद्र यादव यांना सहा मार्च पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.



### मेफेड्रोनसाठी कोणी मदत केली

» हजर करण्यात आले. गुन्हे शाखेच्या युनिट एकचे पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद यांनी तपासाबाबत न्यायालयात माहिती दिली. पुणे पोलिसांनी आंतराष्ट्रीय पातळीवरील अमली पदार्थ तस्करी प्रकरण उघडकीस आणले. आतापर्यंत पोलीसांनी एकूण तीन हजार ६७५ कोटी १३ लाख ६० हजार रुपयांचे एक हजार ८३७ किलो ५६८ ग्रॅम मेफेड्रोन जप्त केले आहे. आरोपींनी मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन उत्पादन, साठा, वितरण केले आहे. पुण्यातील प्रमुख अमली पदार्थ तस्कर हैदर शेखने मेफेड्रोन विक्रीतून मिळालेले पैसे दिल्लीतील वीरेन सिंग, संदिप धुनिया यांना पाठविल्याचा संशय असून त्याबाबत तपास करण्यात येत असल्याचे पोलीस निरीक्षक सय्यद यांनी न्यायालयात सांगितले.आरोपींनी अमली पदार्थ विक्रीतून मिळालेल्या पैशांमधून मालमत्ता खरेदी केली का?, मेफेड्रोन तयार करण्यासाठी त्यांना कोणी मदत केली, तसेच त्यांनी रासायनिक पदार्थ कोठून आणले, यादृष्टीने तपास करायचा आहे. त्यासाठी पोलीस कोठडी देण्याची विनंती सहायक सरकारी वकील अॅड. नीलीमा यादव-इथापे यांनी युक्तीवादात केली.

# उष्णतेच्या लाटांसह यंदाचा उन्हाळा कडक

## तीन महिन्यांसाठी हवामान विभागाचा अंदाज काय?

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

यंदा उन्हाळ्याची तीव्रता जास्त जाणवणार आहे. मार्च ते मे या तीन महिन्यांत देशभरात तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदवले जाण्याची, तर महाराष्ट्रासह दक्षिणेतील राज्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी मार्च ते मे या कालावधीसाठीच्या हवामानाचा अंदाजाची पत्रकार परिषदेत माहिती दिली. पॅसिफिक महासागरात एल निनो स्थिती सक्रिय होण्यास गेल्या वर्षी सुरुवात झाली होती. तसेच ही स्थिती मेपर्यंत कायम राहण्याचा अंदाज जागतिक प्रारूपांकडून वर्तवण्यात आला होता. त्यानुसार आता एल निनोची तीव्रता कमी होऊ लागली आहे.



एल निनो मोसमी पावसाच्या सुरुवातीला संपुष्टात येईल. हिंदी महासागरातील इंडियन ओशन डायपोल हा वातावरणीय घटक मार्च ते मे या काळात तटस्थ होईल, असे डॉ. महापात्रा यांनी सांगितले.एल निनोची तीव्रता आता कमी होऊ लागली असली, तरी त्याचा परिणाम तापमान वाढण्यावर होणार आहे. त्यामुळे मार्च ते मे या कालावधीत तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. यंदाच्या उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटा सरासरीपेक्षा जास्त येऊ शकतात. महाराष्ट्र, ओडिशा यांच्यासह दक्षिणेतील तेलंगणासारख्या राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटा येऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे, असे डॉ. महापात्रा यांनी स्पष्ट केले.देशभरात मार्चमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचाही अंदाज आहे. सन १९७१ ते २०२० या कालावधीत देशभरातील मार्चमधील पावसाची सरासरी २९.९ मिलीमीटर आहे. त्यामुळे यंदा मार्चमध्ये सरासरीच्या ११७ टक्के पावसाची शक्यता आहे. तसेच मार्चमध्ये उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यता आहे, असे डॉ. महापात्रा यांनी सांगितले.